# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९८००७
वेबसाइट : www.unipune.ernet.in
इ-मेल : dyracademic@unipune.ernet.in

संदर्भ क्र. : स्नीए/७९२०

दिनांक : २४/१०/२००८

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव,
संदिप फाऊण्डेशनचे
संदीप इन्स्टिटयुट ऑफ
टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च सेंटर,
पो. ऑ. महिरावणी, जि. नाशिक.

विषय : शैक्षणिक वर्ष २००८—०९ पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय क्र. टीइएम/२००८/(२६०/०८)/तांशि—१ दि. ३०/६/२००८

महोदय,

वरील विषय संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या वरील महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००८—०९ या एका वर्षा करीता १) मेकॅनिकल इंजिनीअरिंग २) कॉम्प्युटर इंजिनीअरिंग ३) इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी ४) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलीकम्युनिकेशन इंजि. या अभ्यासक्रमाचे (प्रत्येकी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह) नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय पो. ऑ. महिरावणी,जि. नाशिक. येथे कायम विनाअनुदानित तत्त्वावर सुरू करण्यास अहवालातील अटी व शर्तीची पूर्तता तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ८१ मधील अटींच्या अधीन राहून व पुणे विद्यापीठ अध्यादेश १७१ प्रमाणे बॅकेत ठेव ठेवणे महाविद्यालयवार बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे नवीन महाविद्यालय सुरू करताना ए. आय. सी. टी. ई.नवी दिल्ली/महाराष्ट्र शासन / विद्यापीठ नियमानुसार आवश्यक प्राचार्य,शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची नेमणूक करणे, महाविद्यालयावर बंधन कारक राहतील. तसेच पुणे विद्यापीठव महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी अस्तित्वात येणारे नियम आपणास बंधनकारक राहतील. याची नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयाचा ओळख क्रमांक **(ID.No.PU/NS/Engg. /123 /2008)** हा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी) २४/१०

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबत : अहवाल